( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**(प्रकाशनयोग्य)**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**दिवाणी अपील न्यायाधिकारक्षेत्र**

**दिवाणी अपील क्रमांक १७८७/२०२३**

**२४ मार्च २०२३ रोजी निर्णय देण्यात आला**

**महासंचालक, भारतीय दूरदर्शन प्रसार भारती निगम आणि इतर ................. अपीलकर्ते;**

**विरुद्ध**

**मॅगी एच. देसाई. ......................... उत्तरार्थी**

**दिवाणी अपील क्र. १७८७/२०२३**

**या प्रकरणात उपस्थित असलेले वकीलः वरिष्ठ अधिवक्ता श्री. राजीव**

**शर्मा,अपीलकर्त्यांसाठी,**

श्री. साहिल भलाईक, अभिलेख अधिवक्ता (AOR)

ॲड. श्री. तुषार गिरी

ॲड. श्री. सहोन पाटील,

ॲड. श्री. साकेत चंद्र,

ॲड. श्री. प्रणव गिरी,

ॲड. गुलशन जहान,

ॲड. श्री. हार्दिक विरेंद्रकुमार वोरा - प्रतिवादींसाठी

ॲड. श्री. समीर सिंह,

ॲड. श्री. करण ठाकूर,

ॲड. श्री. अजय नैन,

ॲड. श्री. अनमोल हरणा,

ॲड. सुकेश कुमार मिश्रा, कु. नीलम सिंग, अभिलेख अधिवक्ता (AOR)

**न्यायमूर्ती एम. आर. शाह यांच्याद्वारे न्याय निर्णय देण्यात आला :-**

विशेष दिवाणी अर्ज क्र. १४५९२/२०२१ मध्ये गुजरात उच्च न्यायालय, अहमदाबाद यांनी दिनांक १७/०२/२०२२ रोजी दिलेल्या आक्षेपित निकाल आणि आदेश, ज्याद्वारे उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय घटनापीठाने प्रतिवादीने सादर केलेल्या या रिट याचिकेला परवानगी दिली आहे आणि निर्देश दिले आहेत की येथे प्रतिवादीच्या सेवा-निवृत्ती वेतन/निवृत्ती लाभांसाठी पात्रता सेवेची गणना करण्याच्या उद्देशाने कंत्राटी म्हणून सादर केलेल्या प्रतिवादीच्या सेवा तात्पुरती सेवा म्हणून गणल्या जातील, या न्यायनिर्णयाने व्यथित आणि असमाधानी होऊन भारतीय दूरदर्शन प्रसार भारती निगम चे महासंचालक आणि इतर यांनी सध्याचे अपील केले आहे.

२. प्रस्तूत अपीलाकडे नेणारी तथ्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेतः

३. हे की , येथे प्रतिवादी - मूळ अर्जदार १९८५ मध्ये कंत्राटी/तात्पुरत्या आधारावर सामान्य सहाय्यक या पदावर कार्यरत होते. तथापि, काही दिवसांच्या खंडांसह प्रतिवादीच्या सामान्य सहाय्यक म्हणून सेवा ह्या करार/तात्पुरत्या आधारावर नंतर वेळोवेळी वाढविण्यात आल्या. त्यानंतर मूळ अर्जदाराने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, अहमदाबाद खंडपीठ, अहमदाबाद (थोडक्यात, 'न्यायाधिकरण') यांच्या समक्ष मूळ अर्ज क्रमांक ३२/१९८७ दाखल केला. सदर मूळ अर्ज दिनांक ३०/०८/१९९० च्या आदेशान्वये अंशतः मान्य करण्यात आला होता व त्यानुसार संबंधित विभाग-अपीलकर्ते यांना ऑक्टोबर, १९९० पासून इतर नियमित सामान्य सहाय्यक/लिपिकांना जे वेतन आणि भत्ते दिले जात होते तेच वेतन आणि भत्ते तिला/अर्जदारास थकबाकीसह प्रदान करण्याबाबत आदेशित केले होते.

४. त्यानंतर, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, नवी दिल्लीच्या प्रधान घटनापीठाच्या नैमित्तिक कर्मचाऱ्यांना विशिष्ठ योजना तयार करून नियमित करण्याच्या निर्णयानुसार, दूरदर्शनच्या नैमित्तिक कलाकार कर्मचारी नियमितीकरण योजना, १९९२/९४ अनुसार मूळ अर्जदाराच्या सेवा ३१/०३/१९९५ पासून निम्न स्तर लिपिक म्हणून नियमित केल्या गेल्या. मूळ अर्जदारास त्या पदावरील नियमिततेच्या तारखेपासून निम्न स्तर लिपिक पदाचा नियमित वेतन स्तर देण्यात आला होता.

५. त्यानंतर मूळ अर्जदाराने तिच्या मागील सेवेचा विचार करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे दाद मागितली. सदर मूळ अर्जातील विषय हा उच्च न्यायालयासमोर रिट याचिकेचा विषय असल्यामुळे मूळ अर्ज फेटाळून लावण्यात आला. मूळ अर्जदाराला विभागाकडे निवेदन सादर करण्याची परवानगी उच्च न्यायालयाने दिली. त्यानंतर उत्तरवादी -मूळ अर्जदाराने दिनांक ११/०४/२०१४ रोजी निवेदन सादर केले. दिनांक १८/०९/२०१४ च्या आदेशानुसार, विभागाने तिला निवृत्ती/सेवा लाभांची गणना करण्यासाठी १९८५ पासून ३१/०३/१९९५ पर्यंत प्रदान केलेल्या तात्पुरत्या/कंत्राटी सेवांचा लाभ देण्याबाबतचे प्रतिवादीचे निवेदन नाकारले.

६. त्यानंतर, मूळ अर्जदाराने न्यायाधिकरणासमोर आणखी एक मूळ अर्ज क्रमांक ४४६/२०१४ दाखल केला. न्यायाधिकरणाने दिनांक ०८-०९-२०२१ च्या तपशीलवार निर्णयाद्वारे आणि आदेशाद्वारे उत्तरवादीने कंत्राटी/तात्पुरत्या म्हणून प्रदान केलेल्या सेवांचा विचार केला जाऊ शकत नाही आणि/किंवा त्या तात्पुरत्या सेवा म्हणून गणल्या जाऊ शकत नाही आणि म्हणून प्रदान केलेल्या सेवा ह्या सेवानिवृत्ती/सेवांच्या लाभाच्या उद्देशाने गणल्या जाणार नाहीत असे निरीक्षण नोंदवून उक्त मूळ अर्ज फेटाळून लावला. मूळ अर्ज फेटाळण्याचा न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय आणि आदेश हा उच्च न्यायालयासमोर रिट याचिकेचा विषय होता.आक्षेपित निर्णय आणि आदेशाद्वारे, उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय घटनापीठाने असे निरीक्षण नोंदवले आहे की,

तात्पुरत्या क्षमतेच्या सेवांमध्ये तात्पुरत्या किंवा अगदी कंत्राटी अशा तात्पुरत्या सेवकांच्या वर्गांचा समावेश असेल.असे निरीक्षण नोंदवून आणि लागू असलेल्या नियम १३ वर भर देऊन, उच्च न्यायालयाने रिट याचिकेला परवानगी दिली आहे आणि निर्देश दिले आहेत की, उत्तरार्थी - रिट याचिकाकर्तीची कंत्राटी/तात्पुरत्या सेवा ह्या नियमांनुसार पात्रता सेवेची गणना करण्याचा हेतूने तात्पुरत्या सेवा म्हणून गणल्या जातील आणि त्यानुसार तिला तिच्या निवृत्तीनंतर पेन्शन दिली जाईल. उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निकाल आणि आदेश हा प्रस्तूत याचिकेचा विषय आहे.

७. अपीलकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील राजीव शर्मा यांनी जोरदारपणे निवेदन केले की, १९८५ पासून ३१/०३/१९९५ रोजी त्यांच्या सेवा नियमित होईपर्यंत, उत्तरार्थी यांनी तात्पुरत्या/कंत्राटी कर्मचारी म्हणून सेवा प्रदान केल्या. हे सादर करण्यात आले आहे की, तात्पुरत्या/कंत्राटी कर्मचारी म्हणून दिल्या जाणाऱ्या सेवा तात्पुरत्या कर्मचारी म्हणून आणि/किंवा तात्पुरत्या सेवेसाठी दिल्या जात असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. त्यामुळे केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ (यापुढे 'नियम १९७२' म्हणून संदर्भित) च्या नियम १३ चे परंतुक लागू होऊ शकणार नाही आणि त्यामुळे तात्पुरत्या/कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रदान केलेल्या सेवा निवृत्तीवेतन लाभ/सेवा लाभांच्या उद्देशाने मोजल्या जाऊ शकत नाहीत.

८. असे सादर केले जाते की उच्च न्यायालयाने 'नियम १९७२' मधील १३ व्या नियमाचा चुकीचा अर्थ लावला आहे आणि तात्पुरत्या क्षमतेच्या सेवांमध्ये तात्पुरत्या किंवा अगदी कंत्राटी अशा तात्पुरत्या सेवेच्या वर्गांचा समावेश असेल असे निरीक्षण आणि निर्णय घेण्यात गंभीररीत्या चुकलेले आहे.

९. वरील निवेदने सादर करून, प्रस्तूत अपीलाला परवानगी द्यावी अशी प्रार्थना करण्यात आली आहे.

१०. उत्तरार्थीच्या वतीने हजर असलेले विद्वान वकील श्री. हार्दिक वोरा यांनी प्रस्तूत अपीलाला तीव्र विरोध केला आहे. असे सादर करण्यात आले आहे की, अशा प्रकारे उत्तरार्थी यांनी तात्पुरत्या किंवा कंत्राटी म्हणून प्रदान केलेल्या सेवांपैकी ५० टक्के सेवांवर दावा करत आहे. असे सादर करण्यात आले आहे की, इतर विभागांमध्ये, तात्पुरत्या म्हणून प्रदान केलेल्या सेवांपैकी ५० टक्के सेवा तात्पुरती सेवा मानल्या जाव्यात असे योजना प्रदान करतात आणि त्यामुळे ती निवृत्तीवेतन लाभ/सेवा लाभांच्या उद्देशाने मोजली जावीत. तथापि, उत्तरार्थीच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील कोणत्याही वैधानिक तरतुदीकडे लक्ष वेधण्याच्या स्थितीत नाहीत ज्या अंतर्गत उत्तरार्थी निवृत्तीवेतन लाभ/सेवा फायद्यांच्या उद्देशाने तात्पुरत्या/कंत्राटी म्हणून प्रदान केलेल्या ५०% सेवांवर दावा करत आहे. तथापि, असे सादर केले आहे की, इतर विभागांमध्ये अशा योजना आहेत आणि म्हणून त्याच धर्तीवर उत्तरार्थी समान लाभाचा दावा करीत आहे.

११. आम्ही संबंधित पक्षांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे लक्षपुर्वक ऐकले आहेत.

१२. प्रारंभीच ही नोंद घेणे आवश्यक आहे आणि हे मान्य केले गेले आहे की, १९८५ ते ३१/०३/ १९९५ या कालावधीसाठी उत्तरार्थीने तात्पुरते/कंत्राटी कर्मचारी म्हणून काम केले आणि योजनेनुसार तिच्या सेवा ३१/०३/१९९५ पासून नियमित केल्या गेल्या. त्यामुळे नियमितीकरण योजनेत असा उल्लेख नाही की तात्पुरत्या सेवांची गणना निवृत्ती वेतन लाभ/सेवा लाभासाठी केली जाईल. वर्ष २००९ मध्ये कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (DOPT) प्रसिद्ध केलेल्या स्पष्टीकरणांमध्ये, असे स्पष्ट करण्यात आले होते की, अशी नियुक्ती धारण करणारी व्यक्ती ही सरकारी पदावर नियमितपणे नियुक्ती होण्यापूर्वी त्याने/तिने प्रदान केलेल्या कंत्राटी सेवांचा कोणताही लाभ मिळविण्यास पात्र नाही.

१३ . केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ हे उत्तरार्थीना लागू आहेत. 'नियम १९७२' मधील नियम क्रमांक १३ आणि १४, जे प्रस्तूत प्रकरणातील विवाद निश्चित करण्यासाठी आवश्यक आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत:-

> "१३. अर्हताप्राप्त सेवेची सुरुवात:- या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, सरकारी कर्मचाऱ्याची पात्रता सेवेची सुरुवात ज्या पदावर त्याची प्रथम नियुक्ती केली जाते त्या पदाचा कार्यभार स्वीकारण्याच्या तारखेपासून, एकतर मूळ किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरत्या क्षमतेने सुरू होईलः
>
> परंतु, स्थानापन्न किंवा तात्पुरत्या सेवेनंतर कोणत्याही अडथळ्याशिवाय त्याच किंवा अन्य सेवेमध्ये किंवा पदावर स्पष्ट नियुक्ती केली जातेः
>
> पुढे असे सांगितले आहे की -
>
> (क) गट 'ड' सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत........
>
> (ख) खंड (क) मध्ये समाविष्ट नसलेल्या सरकारी कर्मचाऱ्याच्या बाबतीत,
>
> १४. कोणत्या सेवा पात्र आहेत त्या अटीः
>
> (१) सरकारी कर्मचाऱ्याची सेवा तोपर्यंत पात्र ठरणार नाही जोपर्यंत त्यांची कर्तव्ये आणि पगार सरकारद्वारे किंवा सरकारने ठरवलेल्या अटींनुसार नियंत्रित केली जात नाहीत.
>
> (२) उपनियम (१) च्या उद्देशांसाठी, 'सेवा' या संज्ञेचा अर्थ, भारत सरकारच्या एकत्रीकृत निधि किंवा त्या सरकारने प्रशासित केलेल्या स्थानिक शासनाचा निधि त्या सरकारने दिलेली आणि सरकारखालील सेवा असा आहे, परंतु शासनाकडून अशी सेवा पात्रता सेवा मानली जात नाही तोपर्यंत सेवा निवृत्तीवेतन पात्र नसलेल्या आस्थापनेतील सेवेचा त्यात समावेश नाही.
>
> (३) हे नियम ज्या सेवेस किंवा पदास लागू होतात त्या सेवेत किंवा पदावर कायमस्वरूपी बदली झालेल्या राज्य सरकारच्या सरकारी कर्मचाऱ्याच्या बाबतीत, राज्य सरकारच्या अखत्यारीत कार्यरत किंवा तात्पुरत्या पदावर, जर असेल तर, केलेली सातत्यपूर्ण सेवा, त्यानंतर कायमस्वरूपी नियुक्ती, किंवा त्या सरकारच्या अंतर्गत, यथास्थिती, कार्यवाहक किंवा तात्पुरत्या पदावर केलेली सातत्यपूर्ण सेवा, पात्र ठरेलः
>
> परंतु, हे नियम लागू असलेल्या सेवेवर किंवा पदावर प्रतिनियुक्तीशिवाय नियुक्त केलेल्या अशा कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला या उप-नियमात समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. "

१४. 'नियम १९७२' मधील अंतर्भूत नियम क्रमांक १३ मध्ये पात्रता सेवा सुरू करण्याची तरतूद आहे. नियम १३ नुसार सरकारी कर्मचाऱ्याची पात्रता सेवा तो ज्या पदावर प्रथम मूळ किंवा स्थानबद्ध किंवा तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त झाला होता त्या पदाचा कार्यभार स्वीकारण्याच्या तारखेपासून सुरू होईल. त्यात पुढे अशी तरतूद करण्यात आली आहे की अशा स्थानापन्न किंवा तात्पुरत्या सेवेनंतर त्याच किंवा दुसर्या सेवेत किंवा पदावर कायमस्वरूपी नियुक्ती केली जाते. त्यामुळे मूळ पदावर किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरती सेवा म्हणून प्रदान केलेल्या सेवांना पात्रता सेवा मानले जाईल. तात्पुरत्या/कराराच्या आधारावर प्रदान केलेल्या सेवेला स्थानापन्न किंवा तात्पुरती सेवा म्हणून संबोधले जाऊ शकत नाही. तात्पुरती सेवा म्हणून प्रदान केलेल्या सेवा देखील पात्र सेवा म्हणून गणल्या जाऊ शकतात, जेव्हा अशी स्थानापन्न किंवा तात्पुरती सेवा त्याच सेवेवर किंवा इतर कोणत्याही सेवा किंवा पदावर विना अडथळा नियुक्तीद्वारे चालू ठेवली जाईल. तात्पुरत्या /कंत्राटी म्हणून प्रदान केलेली सेवा ही मूळ नियुक्तीवर प्रदान केलेली सेवा असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

१५. या परिस्थितीत आणि 'नियम १९७२' अंतर्गत समाविष्ट असलेले नियम १३ चे न्याय्य वाचन आणि अर्थ लावण्याबाबत, उच्च न्यायालय हे तात्पुरत्या स्वरूपातील सेवांमध्ये तात्पुरत्या किंवा अगदी कंत्राटी अशा तात्पुरत्या सेवेच्या वर्गांचा समावेश असेल असे निरीक्षण करताना गंभीरपणे चुकलेले आहे. कंत्राटी सेवा तात्पुरत्या क्षमतेने सेवा म्हणून पात्र ठरेल असे निरीक्षण नोंदवून उच्च न्यायालयाने चूक केली आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिल्या जाणाऱ्या सेवा तात्पुरत्या स्वरूपात पात्र आहेत की नाही हा प्रश्न नाही. खरे तर अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांनी या सेवा तात्पुरते सेवक म्हणून दिल्या आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

१६. आता जोपर्यंत प्रतिवादीच्या वतीने असे सादर केले जात आहे की, विशिष्ट योजनेअंतर्गत इतर विभागांमध्ये अशा विभागांचे कर्मचारी निवृत्तीवेतन/सेवा लाभांसाठी पात्र

सेवेसाठी गणल्या जाणाऱ्या तात्पुरत्या/कंत्राटी म्हणून प्रदान केलेल्या सेवांसाठी पात्र आहेत, केवळ इतर काही विभागांमध्ये अशा योजना असू शकतात म्हणून, प्रतिवादीने ज्या अपीलकर्त्याच्या विभागात/विभागात सेवा दिली आहे त्या विभागात कोणतीही योजना नसल्यामुळे प्रतिवादी हे उक्त लाभासाठी पात्र असणार नाहीत. अपीलकर्ता-दूरदर्शन प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम)ही एक स्वायत्त व स्वतंत्र विभाग/संस्था आहे. वर नमूद केल्याप्रमाणे, तात्पुरत्या /कंत्राटी म्हणून प्रदान केलेल्या सेवांना तात्पुरती सेवा मानले जाईल आणि/किंवा ती निवृत्तीवेतन/सेवा लाभांच्या उद्देशाने मोजली जातील, अशी नियम किंवा नियमितीकरण योजनेत कोणतीही तरतूद नाही.

१७. वरील बाबी लक्षात घेऊन आणि उपरोक्त कारणे लक्षात घेता, उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निर्णय आणि आदेश टिकण्या जोगा नाही आणि तो रद्द करण्यास आणि बाजूला साऱण्यास पात्र आहे आणि त्यानुसार तो रद्द केला जात आहे आणि बाजूला सारण्यात आला आहे. मूळ अर्ज फेटाळणारा न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय आणि आदेश याद्वारे पुनर्स्थापित करण्यात येत आहे.त्यानुसार प्रस्तूत अपीलाला परवानगी देण्यात येत आहे.तथापि, खटल्यातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार, खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

*****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****